शनिवार दि.२२ फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१६० किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# खेळाच्या मैदानांचा खेळासाठीच वापर करा उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश

## भूखंड भाडेपट्टा नूतनीकरणासाठी नवीन धोरण ठरवणार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

खेळांना आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे राज्य सरकारचे धोरण आहे. मुंबईतील ओव्हल मैदान, आझाद मैदान व क्रॉस मैदानातील भूखंडांच्या भाडेपट्टा कराराचे क्रीडा क्लबसोबत नूतनीकरण करण्यासाठी महसूल, क्रीडा, सार्वजनिक बांधकाम व नगरविकास विभागाने एकत्र येऊन समन्वयाने स्वतंत्र, सर्वसमावेशक धोरण तयार करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिले. कोणत्याही परिस्थितीत खेळांची मैदाने केवळ खेळांसाठीच वापरण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.मुंबईतील आझाद मैदान, क्रॉस मैदान आणि ओव्हल मैदानातील भूखंडांच्या भाडेपट्टा कराराच्या नूतनीकरणासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे (दूरदृश्य प्रणालीद्वारे), महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी (दूरदृश्य प्रणालीद्वारे), क्रीडा विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, सार्वजनिक बांधकाम विभाग (रस्ते)चे सचिव सदाशिव साळुंखे, क्रीडा विभागाचे आयुक्त हिरालाल सोनवणे (दूरदृश्य प्रणालीद्वारे), नियोजन विभागाचे सहसचिव दीपक देसाई, महसूल विभागाचे उपसचिव धनंजय निकम, नगरविकास विभागाचे सहसचिव निर्मलकुमार चौधरी, विधी व न्याय विभागाच्या उपसचिव मनिषा कदम, मुंबईचे अतिरिक्त जिल्हाधिकारी रविंद्र कटकधोंड, मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक, उपाध्यक्ष संजय नाईक, सचिव अभय हडप, सहसचिव दीपक पाटील, खजिनदार अरमान मल्लिक, कार्यकारी सचिव सी. एस. नाईक, सदस्य संदीप विचारे, प्रमोद यादव आणि महाव्यवस्थापक किंजल पटेल आदी मान्यवर उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, मुंबईतील आझाद मैदान, ओव्हल मैदान व क्रॉस मैदान ही सर्व खेळांसाठी महत्त्वाची मैदाने आहेत. या मैदानांवर हजारो क्रीडापटू रोज विविध क्लबच्या माध्यमातून प्रशिक्षणासह खेळाचा सराव करत असतात. या तिन्ही मैदानाची मालकी महसूल विभागाची आहे. क्रीडा विभागामार्फत ती खेळाच्या क्लबला भाडेपट्टा कराराने देण्यात येतात. सध्या या तिन्ही मैदानांवरील भूखंडांवर साठहून अधिक क्लब खेळाडूंना प्रशिक्षणाच्या व सरावाच्या सुविधा देतात. या क्लबचा भाडेपट्टा करार संपला असून तो पुन्हा करण्यासाठी महसूल विभाग, क्रीडा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व नगरविकास विभागाने एकत्र येऊन समन्वयाने एक स्वतंत्र, सर्वसमावेशक धोरण तयार करावे. हे नव्याने तयार करण्यात येणारे धोरण मंजुरीसाठी मंत्रिमंडळासमोर ठेवून त्याला अंतिम स्वरूप देण्यात येईल. महसूल, क्रीडा, सार्वजनिक बांधकाम व नगरविकास या चारही विभागांनी विहित वेळेत भाडेपट्टा करारासाठीचे सर्वसमावेशक धोरण तयार करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.तसेच आझाद मैदान, ओव्हल मैदान व क्रॉस मैदानावर खेळाडूंसाठी स्वच्छतागृहे व चेंजिंग रूम उभारण्याच्या सूचना देताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, ही स्वच्छतागृहे अत्याधुनिक करताना खेळाच्या सरावाला बाधा येऊ नयेत, तसेच मैदानाचे सौंदर्य खराब होऊ नये याची दक्षता घेत ती मैदानाच्या एका कोपऱ्यात उभारण्यात यावीत. कोणत्याही परिस्थितीत खेळाच्या मैदानांचा वापर केवळ खेळांसाठीच व्हावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

# सिडको येथे श्री शिव महापुराण कथा व शिव किर्तन सोहळ्याचे आयोजन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील गायकवाड**

नवीन नांदेड सिडको येथील कुबेरेश्वर महादेव मंदिर आणि महारुद्र हनुमान मंदिर येथे २४ फेब्रुवारी ते ३ मार्च २०२४ या कालावधीत श्री शिव महापुराण कथा व शिव किर्तनाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्यात वेदशास्त्रसंपन्न ह.भ.प. अनिल महाराज माजलगावकर कथा सांगणार असून संगीताबाई कार्लेकर यांचे मधुर शिव कीर्तन होणार आहे.संगीताबाई कार्लेकर यांच्या आवाजात
शिव कीर्तन,व्याख्यान ,मंगलाचरण, ज्योर्तीलिंग उत्पत्ती, भैरव उत्पत्ती, रुद्राक्ष महिमा,शिवसती विवाह, गणेश–कार्तिकेय जन्म, त्रिपुरवध, नटराज महिमा,अकरा रुद्र, अर्धनारीश्वर, भिक्षुक अवतार, द्विजेश्वर अवतार इत्यादी विषयांवर प्रवचन,याशिवाय १२ ज्योतिर्लिंग कथा, महाशिवरात्र विशेष कथा, नरक वर्णन कालकीर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.उमासहिता आणि शिवपुराण महात्म्य, महाप्रसाद ठेवण्यात आले आहे.या भक्तिमय शिव महापुराण कथेचे आयोजन संतोषसिंह चौहान परिवार, सिडको नांदेड यांच्या वतीने करण्यात आले असून वैष्णवीदेवी नवरात्र महोत्सव मंडळ, सिडको नांदेड यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. कुबेरेश्वर महादेव मंदिर, महारुद्र हनुमान मंदिर, एन.डी. ४१, दत्तनगर, सिडको, नांदेड. येथे भाविकांनी या शिवमय कथा अमृतसागराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.




# स्वराज्याचा धगधगता इतिहास मॉडर्नच्या विद्यार्थ्यांनी पडद्यावर अनुभवला

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

उमरी येथील मॉडर्न इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी आज नांदेड येथील पी. व्ही. आर. चित्रपट गृहात छावा हा ऐतिहासिक चित्रपट पाहिला. छत्रपती श्री शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेले स्वराज्य स्वधर्म यांना आबाधित ठेवण्यासाठी वीर संभाजी महाराज यांनी दिलेला लढा व त्यांचे बलिदान त्यांच्या जीवनातील रोमांच पूर्ण घटना अतिशय भावपूर्ण पणे विद्यार्थ्यांनी अनुभवल्या स्वराज्य कसे घडले त्यासाठी किती लोकांनी कसे बलिदान दिले
ह्याची जाणिव शालेय विद्यार्थ्यांना व्हावी हा दृष्टिकोन समोर ठेऊन शाळेच्या मुख्याधिपिका सौ. अनुराधा कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना हा चित्रपट दाखविण्यासाठी पुढाकार घेतला. ह्यापूर्वी स्वातंत्र्यवीर सावरकर, उरी हे देशभक्तीपर चित्रपट विद्यार्थ्यांना वेळोवेळी दाखविले आहेत. शालेय विद्यार्थ्यांचे मनात देशप्रेम जागृत व्हावे हा ह्यामागील मुळ उद्देश होय. आज मॉडर्नच्या विद्यार्थ्यांनी छावा हा छत्रपती संभाजी राजे यांचे जीवनावरील चित्रपट पाहिला. त्यानंतर विद्यार्थ्यांचे राष्ट्रप्रेम उफाळून येऊन त्यांनी जय भवानी, जय शिवाजी, छत्रपती संभाजी महाराज कि जय असे जोशपूर्ण नारे दिले त्यामुळे आसमंत दुमदुमून गेले होते. शाळेतील १५० विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी हा चित्रपट पाहिला.




# ओव्हर लोड चालणाऱ्या वाहनांवर प्रशासनची दंडात्मक कारवाई कधी

## धनाजी जोशी यांचा प्रशासनाला सवाल



लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । प्रतिनिधी**

देगलूर येथे दिवसा ढवळ्या अनेक वाहणे क्षमते पेक्षा जास्त माल घेऊन वाहतूक करत असल्याचे पाहायला मिळाले, योगायोगाने आज नगर परिषद येथे कामा संदर्भात गेले असता श्री छत्रपती शिवाजी महाराज पार्कच्या रोड वरुन एक मोठा कर्कश आवाज झाला सर्व नागरिकांनी नगर परिषदेच्या बाहेर येऊन बघितले असता ओव्हर लोड माल घेऊन जाणारे एक हायवाचे टायर फुटल्याचे निदर्शनास आले टायर फुटल्याने रोडवरुन गाडी मागे पुढे घेण्यासाठी ड्रायव्हर प्रयत्न करतं होता पण त्याचा नाईलाज गाडीत ओव्हर लोड माल असल्यामुळे खूप कठीण जात होते त्यामुळे त्याठिकाणी बराच वेळ वाहतूक कोलमडली,या ओव्हर लोड गाड्या दिवसा ढवळ्या शहरात न आणता त्यांना रात्रीच्या वेळी शहरात प्रवेश देऊन प्रशासनाने सामान्य नागरिकांना दिलासा द्यावा कारण दिवसा शाळेचे विद्यार्थी हे सायकलवर पाई स्वरूपात शाळेत जातात महिला बाजारात जाता अनेक अवजड ओव्हर लोड गाड्यामुळे कितेकदा अपघात हे देगलूर वासियांना माहिती आहे आता पर्यंत अनेक निष्पाप बळी गेले आहेत या मोठ्या ओव्हर लोड गाड्यामुळे जीव गेले असल्याने याची जान ठेऊन प्रशासनाने याची दखल घेऊन ओव्हर लोड गाड्यावर दिवसा ढवळ्या शहरात न आणता त्यांना संध्याकाळी शहरात प्रवेश देऊन सामान्यांना दिलासा देणारं का ? तसेच ओव्हर लोड वाहणावर दंडात्मक कारवाई करणार का? याबाबत धनाजी जोशी यांनी प्रशासनाला सवाल केले आहेत.




दैनिक लोकनेता



# अविष्कार कलागुणांचा कार्यक्रमातून बाल कलाकारांनी श्रोत्यांना केले मंत्रमुग्ध-मिनू साहेब श्राफ हायस्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**

तालुक्यातील मोजे हाळदा येथील कै.मिनू साहेब श्राफ हायस्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनात अविष्कार कलागुणांचा या बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपली अदाकारी प्रेक्षकापुढे सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

कै.मिनू साहेब श्राफ हायस्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन मान्यवरांच्या उपस्थितीत नुकतेच पार पडले.यावेळी उद्घाटक म्हणून नूतन विद्यालय सेवाभावी शिक्षण संस्था उमरी चे सचिव मा.कैलासराव देशमुख गोरठेकर हे उपस्थित होते तर अध्यक्षस्थानी हाळदा येथील माजी सरपंच भुजंगराव भोसले यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष तथा माजी सरपंच बालाजी नार्लेवाड,सरपंच चंद्रकांत नागमोड, मोघाळीचे सरपंच सतीश पाटील पवार,उमरी कृ.उ.बा.समितीचे संचालक गंपू पाटील नांदेकर रोहिदास पाटील नांदेकर,आदर्श शिक्षक मा. आनंदराव अंनतवाड गुरुजी,चेअरमन दत्तराव अक्कलवाड,माजी तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष मारोतराव पेरेवार,दिनकर पाटील जाधव लामकानीकर,बापूराव पाटील लामकानीकर,पोलीस पाटील नागनाथ आमेटवाड,नूतन विद्यालय उमरी चे प्राचार्य नागेश्वर लखमोड आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला हिंदवी स्वराज्याचे संस्थापक राजे छत्रपती शिवाजी महाराज,कै. आमदार बाबासाहेब देशमुख गोरठेकर,कै. आमदार बापूसाहेब देशमुख गोरठेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले व दीप प्रज्वलांनी कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच श्री गणेशाची आराधना लयबद्ध पद्धतीने विद्यार्थिनींनी सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.त्यानंतर नूतन हायस्कूल उमरी व कै.मिनूसाहेब श्राफ हाय. हाळदा येथील बालकलाकारांनी आपली अदाकारी अत्यंत प्रभावीपणे सादर करून उपस्थितांना तीन तास जागेवर खिळवून ठेवले. या विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांचा देखावा,वैष्णवांची पंढरपूर पायी दिंडी यात्रा,नाथांची भारुडे,बंजारा गीते,बहारदार लावण्या,गवळणी व विविध मनोरंजनात्मक गीते तालबद्ध पद्धतीने सादर करून सर्वांची मने जिंकली.श्रोत्यांनीही या बाल कलाकारांच्या कलेवर खुश होऊन अक्षरशः बक्षिसांचा वर्षाव केला.या कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन प्राचार्य संभाजीराव कदम व इंगोले सर यांनी केले तर आभार हायस्कूलचे मुख्याध्यापक कदम सर यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापक, सर्व शिक्षक,शिक्षिका व शिक्षकेत्तकर कर्मचारीवृंद यांनी मोलाचे योगदान दिले.या कार्यक्रमास हाळदा,मोघाळी,लामकानी,नांदा, कामनगाव येथील पालक वर्ग व श्रोतेमंडळी आणि माता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बिडीओ साहेब वागतात बरं,पण गरीबाचं कामही व्हावं खरं ?

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । माधव बैलकवाड**

पंचायत समितीचा कारभार पारदर्शक राहिला असता तर ग्रामीण भागातील गोरगरीब कुटुंब आज घरकुल योजनेपासून वंचित राहिले नसते ही शोकांतिकाच म्हणावे लागेल मौजे खैरगाव येथील शंकर माधवराव घंटेवाड यांच्या कुटुंबाला देश स्वातंत्र्यापासून ते आजवर घरकुल योजनेचा लाभ मिळाला नाही गावचे सरपंच उपसरपंच ग्रामसेवक या कुटुंबासोबत कोणता डाव खेळीत आहेत या प्रश्नाचे उत्तर ग्रामविकास अधिकारी श्री वाजे यांनी खैरगाव येथील ग्रामसभेत येऊन द्यावे असे पत्रकारांशी बोलताना शंकर घंटेवाड यांनी सवाल केलेला आहे.



घरकुल लाभधारक २०१६ च्या यादीत सौ ललिता शंकर घंटेवाड या लाभार्थ्यांची नाव असून ते कसे व का वगळण्यात आले या मागचे मुख्य कारण काय असावे ललिताबाईचे पती शंकर घंटेवाड यांनी पंचायत समिती नायगाव येथे गटविकास अधिकारी यांच्याकडे २७ जानेवारी २०२५ रोजी अर्ज दाखल केलेला आहे परंतु आजवर तरी संबंधित बिडिओ यांनी कुठलीच कार्यवाही केलेली नाही, बिडिओ श्री वाजे यांनी एक वेळेस या कुटुंबाची प्रत्यक्ष भेट देऊन त्यांचे घर बघावे जुन्या काळातील दगड मातीची घर त्यांची मागील बाजू संपूर्ण ढासाळलेली,घरावर फारी झाकलेली दहा-पंधरा फुटाच्या पडक्या घरात शंकर यांची पत्नी दोन मुले वृद्ध आई एवढेजण जीवन जगतात, पावसाचे पाणी गळून गळून एके दिवशी संपूर्ण घरच कोसळले आणि त्यातील कुटुंबाची जीवित हानी झाली तर याला जबाबदार सरपंच ग्रामसेवक व गटविकास अधिकारी हे राहतील काय ? त्यांच्या मरणाचीच वाट ही यंत्रणा पाहते की काय ? हा प्रश्न पुढे येतो.

खैरगाव येथे अनेकांना घरकुलाचा लाभ मिळाला आहे एकाच कुटुंबातील व्यक्तींना दोन तीन चार वेळाही लाभ कधी रमाई आवास योजना तर कधी प्रधानमंत्री योजनेचा लाभ मिळाला ज्या मुलांची लग्नही नाही त्यांचे कुटुंबही नाही तरीही त्यांना लाभ घेता आला असे खैरगाव मध्ये गेल्या पंचवीस वर्षापासून ग्रामपंचायत मार्फत चालते तेव्हा गटविकास अधिकारी यांनी प्रत्यक्षरीत्या गावात येऊन प्रधानमंत्री आवास योजनेची चौकशी करावी अशी विनंती अर्जात शंकर घंटेवाड यांनी नमूद केले आहे. संपन्न झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या अगोदर खैरगाव येथे विद्यमान आमदार राजेश पवार आले असता त्यांना ललिताबाई शंकर घंटेवाड यांनी प्रत्यक्षरीत्या आपल्या पडझड झालेल्या घराची अवस्था आमदार महोदय यांना दाखवली तेव्हा सरपंच यांनी चापुलशीपणा करीत आत्ताच्या चालू यादीत तुमचे नाव आहे घरकुल योजना तुम्हास नक्की मिळेल असे बोलून मोकळे झाले. मग आज या यादीतील नाव का वगळण्यात आले घरकुला विना ललिता शंकर घंटेवाड यांचे कुटुंब हालाखीचे जीवन जगत आहेत हे गटविकास अधिकारी यांनी डोळसपणे पाहणे गरजेचे आहे. शंकर घंटेवाड हा खैरगाव ग्रामपंचायत निवडणुकीत अपक्ष म्हणून उभा राहिल्याने त्यांचा वचपा काढण्यासाठी हे मुख्य कारण मनात ठेवून त्यांना फाटक्यातच ठेवण्यात सरपंच उपसरपंच हे धन्यता मानतात असे यावरून दिसून येते.

# अंगणवाडी सेविका मदतनीसच्या रिक्त जागा भरतीसाठी अर्ज मागणीची प्रक्रिया सुरू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सगरोळी । उत्तम घाटे**

बिलोली तालुक्यातील व सात विभागनिहाय असलेल्या १८५ अंगणवाडी पैकी २९ गावातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या रिक्त जागेच्या भरतीची प्रक्रिया सुरुवात झाली असून, दिनांक १४ फेब्रुवारी ते ३ मार्च २०२५ या कालावधीत अर्ज एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय बिलोली येथे सादर करावा असे आवाहन बाल विकास अधिकारी यांनी केले आहे.यामध्ये तालुक्यातील केसराळी, कासराळी, थडीसावळी केरूर,कुंभरगाव,बेळकोणी बु.,बेळकोणी खू. गुजरी,आरळी,लोहगाव, बिजूर, रामतीर्थ, किनाळा,हिप्परगामाळ, कामरसपल्ली,अटकळी,आळंदी गंजगाव, ममदापुर,हरनाळी सुलतानपूर, नाग्यापूर,डोर, बावलगाव,तळणी लोहगाव, जिगळा, काराळ, दर्यापूर आदी गावांपैकी अंगणवाडी सेविका ५ मदतनीस २७ अशी एकूण ३२ रिक्त जागा भरणार आहेत. त्यासाठी उमेदवारांनी कार्यालयीन वेळेत अर्ज भरावा. संपूर्ण अर्ज वाचून सोबत योग्य ती कागदपत्रे जोडावे. अशा सूचना एकात्मिक बाल प्रकल्प अधिकारी यांच्याकडून करण्यात आले आहे. वार्तांकनासाठी बाल प्रकल्प कार्यालयात गेलो असता दिनांक १८ फेब्रुवारी रोजी केवळ ०७ अर्ज प्राप्त झाल्याची माहिती कनिष्ठ लिपिक योगेश कात्रे यांनी दिली आहे.

# बालकांचा आनंद! ज्ञानाची सावलीस्वातीताई माऊली!

## कोमलवाडी गावातील लहान बालकांचे हस्ते चेहरे स्वाती आडेंच्या प्रयत्नाने घडतील हिरे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**

लहान चिमुकल्या बालकांची पहिली ज्ञानाची पायरी म्हणजे अंगणवाडी ही असते, आणि या पायरीतून कोमलवाडी येथील अंगणवाडी सेविका सौ.स्वाती अरूण आडे यांनी आपल्या अंगणवाडीत शालेय शिक्षण घेणाऱ्या चिमुकल्यांना भक्कम पायाची ज्ञानाची पायरी चढवत आहेत. त्यांनी लहान चिमुकल्यांना अंगणवाडीत पूर्ण वेळ देऊन त्यांच्या शैक्षणिक भवितव्य उत्कृष्ट दर्जाचे करत आहे. यामुळे त्यांची ओळख ही कर्तव्यदक्ष अंगणवाडी सेविका म्हणून होत आहे.



कोमलवाडी येथील ग्रामीण भागांत अंगणवाड्यातील अनुसूचित जातीतील ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातीलज मुला-मुलींसाठी व किशोरवयीन मुली-मुलांसाठी, गरोदर स्तनदा माता यांना अतिरिक्त आहार पुरविणे, मल्टी मिलेट पौष्टिक बिस्किटे पुरविणे या योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्याचे काम अंगणवाडी सेविका सौ.स्वाती अरूण आडे यांनी केले आहे. माझी कन्या भाग्यश्री योजनेंतर्गत लाभार्थीना तसेच लेक लाडकी योजनेंतर्गत याआधी जन्मलेल्या मुलींना लाभ देण्यात त्यांची महत्त्वपूर्ण कामगिरी आहे म्हणून अंगणवाडी सर्वेक्षणाबाबतची संपूर्ण माहिती भरण्यासाठी तसेच अंगणवाडी केंद्रातील नाविण्यपूर्ण उपक्रमाची माहिती त्या वेळोवेळी देतात. अंगणवाडी सेविका सौ.स्वाती अरूण आडे यांच्याकडून समाजाची सेवा घडते. अडचणीच्या काळातही त्यांनी अत्यंत चांगले काम करून नागरिकांना दिलासा दिला. त्यांचे प्रश्न, अडीअडचणी सोडविण्यासाठी सदैव प्रयत्नशील असतात. गरोदर मातांना पोषण आहार देण्याचे काम अंगणवाडीमार्फत केले, अंगणवाडी सर्वस्व परिपूर्ण कशा होतील यासाठी सौ.स्वाती अरूण आडे नेहमी प्रयत्नशील असतात. गर्भवती महिला, महिलेच्या गर्भातील बाळ, नवजात बाळ, स्तनदा माता, आणि बाळाची वयाच्या ६ वर्षांपर्यंत काळजी घेऊन त्यांचे आरोग्य सुदृढ करण्यात अतिशय मोलाचा वाटा उचलण्याचे काम अंगणावाडी सेविका सौ.स्वाती अरूण आडे हे करत असतात.अंगणवाडी सेविका सौ.स्वाती अरूण आडे ह्या सातत्याने सर्व माहिती व दैनंदिन अहवाल आणि नोंदी लिखित स्वरूपात रजिस्टरमध्ये ठेवत असतात. यामध्ये अंगणवाडीतील पूरक पोषण आहार, औषधांचे वाटप, बालकांच्या वजनांच्या नोंदी, लसीकरण यांसह दैनंदिन कामकाजाचा आढावा लिखित स्वरूपात ठेवण्यात आला. या सर्व कामाचा अहवाल कोमलवाडी अंगणवाडी येथे आजही उपलब्ध आहे. तळागाळातील माणसांसाठी काम करणे सोपं नसतं ते आपल्या कर्तव्यातुन अगदी सहज सोपे करावे लागते असे काम सौ.स्वाती अरूण आडे यांनी प्रामाणिकपणे केलेलं आहे. कुपोषणग्रस्त, बालमृत्यू आणि मातामृत्यू थांबावेत, त्याचे प्रमाण कमी व्हावे, यासाठी अनेक योजना कागदोपत्री असतील. माता आणि बालमृत्यू कमी व्हावे यासाठी अंगणवाडी सेविका यांचीच भूमिका खऱ्या अर्थाने महत्वाची ठरली आहे. अंगणवाडीमध्ये मुलांना खेळायला आणि शिकायला मिळावं. त्यांना उत्कृष्ट शिक्षण मिळावं यामुळे त्यांचे चांगले विचार कौशल्य विकसित होण्यास मदत होईल तसेच अंगणवाडीतील सर्व मुलांसाठी बालपणीची काळजी घेणे पहिल्या पाच वर्षांत मुले अनेक नवीन गोष्टी शिकवणं. या काळात ते बोलायला, स्वतःहून गोष्टी करायला आणि इतरांशी कसे वागावे हे समजून घेण्यास शिकवणं. या कारणांमुळे, या काळात मुलांना चांगली काळजी घेऊन आपल्या हातून चांगले काम व्हावे यासाठी अंगणवाडी सेविका सौ.स्वाती अरूण आडे प्रयत्न करतात. अशा उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अंगणवाडी सेविकेला पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा..!!

# लोकप्रिय आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या उपस्थितीत शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा





**दक्षिण नांदेड चे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर साहेब हे अगोदर शिवसेनेचे नांदेड जिल्हा प्रमुख होते.ते शिवसैनिकांना घरच्या माणसांरखे जीव लावतात त्यामुळे एकदा ओळख झालेला शिवसैनिक असो नागरीक त्यांना विसरत नाही.याचा प्रत्यय शिवजयंतीच्या निमित्ताने दिसून आला. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त नांदेड श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथील शिवरायांच्या स्मृतीस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. नांदेड शहरातील वजीराबाद हनुमान पेठ चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवजन्मोत्सवा निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते तेथे आ आनंदराव पाटील बोंढारकर यांचा सत्कार करण्यात आला.**

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील गायकवाड**

जाणता राजा शिवरायांच्या जन्मोत्सवा निमित्ताने नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील तुपा येथे आ आनंदराव पाटील बोंढारकर यांनी उपस्थित राहून श्री शिवरायांच्या पुतळ्यास आणि प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. अखंड हिंदुस्तान की आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सिडको नांदेड येथे आयोजित अन्नदान वाटप आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते करण्यात आले. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सिद्धनाथ गलवई असोसिएशन सराफा बाजार नांदेड येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त आ आनंदराव पाटील बोंढारकर यांनी उपस्थित राहून महाराजांचे दर्शन घेतले व आरती केली आणि मिरवणुकीचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. भक्ती शक्ती आणि युक्ती यांचा त्रिवेणी संगम म्हणजे कुस्ती महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त पैलवान रामेश्वर पाटील काळे यांनी आयोजित केलेल्या भव्य कुस्तीचे उद्घाटन व बक्षीस वितरण आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते करण्यात आले.यावरूनच शहरातील आणि गावातील शिव प्रेमी जनतेला आ आनंदराव पाटील बोंढारकर साहेब यांनी भेटी देऊन शिवजन्मोत्सव सोहळ्याच्या निमित्ताने अनेक ठिकाणी उपस्थित राहून छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन केले.बक्षीस वितरण केले.मिरवणुकीचे उद्घाटन केले , रक्तदान शिबिराचे उद्घाटन केले मतदारसंघातील सर्व ठिकाणी उपस्थिती होती.





# प्रसिद्ध व्याख्याते,लेखक रमेश पवार यांचे समाजोपयोगी पाच पुस्तकांचे सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळ्यात प्रकाशन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गौतम बनसोडे**

मागच्या अनेक वर्षापासून शैक्षणिक व सामाजिक चळवळीत पूर्ण वेळ स्वतःला समर्पक व निस्वार्थ भावनेतून झोकून देऊन काम करणारे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड बहीशाल शिक्षण केंद्राचे व्याख्याते तथा मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव रमेश पवार यांनी महामानवांच्या चरित्रावर शेकडो मोफत व्याख्याने देत वेगवेगळ्या विषयासह महामानवा चरित्रावर संशोधनात्मक लेखन केले आहे. त्यांचे अनेक लेख वर्तमान पत्रातून मासिकातून प्रसिद्ध झाले आहेत.चिकित्सक, संशोधनात्मक तर्कशुद्ध विचारातून ऐतिहासिक सिद्धांतावरील उदाहरणासह वर्तमानात ही सर्व महामानवे समस्त मानवांसाठी कशी प्रेरक आहेत. हे विविध लेखाच्या माध्यमातून प्रेरक महामानव शब्दबद्ध केलेला आहे. विद्यार्थी व तरुणाईला प्रभावीपणे भाषण करता यावे म्हणून प्रभावी भाषण एक कला हे पुस्तक लिहीले असून विद्यार्थी, पालक व समाजाला दिशा दाखवणारे



प्रेरक महामानव, प्रभावी भाषण एक कला,पर्यावरण शिक्षण भविष्याची गरज, विद्यार्थी आणि व्यक्तिमत्व विकास, अभ्यास कसा करावा? अशा पाच पुस्तकाचे प्रकाशन मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड ,जिजाऊ ब्रिगेड व ३२ कक्ष नांदेड आयोजित सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळ्यात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकरावजी चव्हाण,माजी खासदार तथा आमदार प्रतापरावजी पाटील चिखलीकर,नांदेडचे खासदार रविंद्र पाटील चव्हाण, माजी उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री डी. पी.सावंत, माजी आमदार मोहनअण्णा हंबर्डे, मराठा समाज भूषण माधवराव पाटील शेळगावकर,कॉंग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष बी.आर.कदम, उद्योगपती मारोतराव पाटील कवळे, माजी सनदी अधिकारी अनिल मोरे, राज्याचे पूर्व शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे, डॉ, रेखाताई चव्हाण, माजी महापौर जयश्रीताई पावडे, इंजि तानाजी हुस्सेकर, प्रा. संतोष देवराये,माजी सभापती संजय पाटील शेळगावकर, नानाराव कल्याणकर, उध्दवराव सुर्यवंशी, डॉ. सुनील कदम आदी मान्यवरांच्या हस्ते झाले. मराठा सेवा संघाची शिकवण लिहीते व्हा,बोलते व्हा..! अशी आहे. लेखनासाठी प्रेरणा युगनायक ॲड पुरुषोत्तमजी खेडेकर यांच्यामुळे मिळाली ही पाच पुस्तके वाचक वर्गांच्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे. सर्व चोखंदळ वाचकवर्ग या पुस्तकाचे स्वागत करेल अशी भावना लेखक रमेश पवार यांनी व्यक्त केली. अत्यंत समाजोपयोगी या पाच पुस्तकाचे प्रकाशन झाल्याबद्दल लेखकाचे मराठा सेवा संघाचे जेष्ठ मार्गदर्शक मधुकरराव देशमुख,राष्ट्रीय अध्यक्ष कामाजीराव पवार,इंजि शे.रा.पाटील, पूर्व शिक्षणाधिकारी शिवाजीराव खुडे,डॉ.सोपानराव क्षिरसागर, प्रा.डॉ.पंजाबराव चव्हाण, प्रा. संतोष देवराये, इंजि शिवाजीराजे पाटील, इंजि तानाजी हुस्सेकर, पूर्व शिक्षण संचालक डॉ.गोविंद नांदेडे,पूर्व अति. मु.का. अ.शिवाजीराव कपाळे, प्रा.डॉ.हनुमंत भोपाळे, नानाराव कल्याणकर उध्दवराव सुर्यवंशी, भगवानराव ताटे,शिवाजी पाटील आलेगावकर, शिवा कांबळे,पंडीत पवळे, व्यंकटराव जाधव, माजी जिल्हाध्यक्ष पंडीतराव कदम चिखलीकर भंडारा जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी रविंद्र सोनटक्के,नांदेड जिल्हापरिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ.सविता बिरगे,गटशिक्षणाधिकारी सतिश व्यवहारे, देविदासराव बस्वदे, अशोक पाटील, सुधाकर थडके, बंडु पाटील,संकेत पाटील,परमेश्वर पाटील, सुभाष कोल्हे,बालाजी सिरसाट,कृष्णाताई मंगनाळे, सुरेखाताई रावणगावकर,अरूणाताई जाधव,डॉ विद्याताई पाटील, सुमित्राताई वडजकर, कल्पनाताई चव्हाण,अर्चनाताई होगे,वनिताताई देवसरकर आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## नवरंग जनरल स्टोअर्सचे मालक साजिद सेठ यांचे निधन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कुंडलवाडी । गंगाधर दुसलवाड**

साजिद सेठ यांचे निधनाची बातमी नुकतीच शैलेश शेठ यांचा कडून समजली पूर्वीपासून कुंडलवाडी शहारात नवरंग नावाने जनरल स्टोअर्स स्थापन करून सर्व शालेय साहित्य आपल्या स्टोअर्स मध्ये उपलब्ध करून देत.. तत्कालीन अनेक विध्यार्थ्यांना जनरल स्टोअर्सचा अर्थच माहिती नव्हता.शालेय साहित्य किंवा इतर साहित्य कुंडलवाडी शहारात कुठे मिळतात तर फक्त नवरंग मध्ये हेच समीकरण होते.माझ्या आयुष्यात मी जेव्हा नांदेड येथे शिक्षणासाठी गेलो तेव्हा शिक्षण घेत असताना मला काही साहित्य लागतं होते, तेव्हा माझ्या मित्रांना म्हणायचो अरे सर्व साहित्य नवरंग मध्ये मिळते,नवरंग मधून घेऊ तेव्हा माझे मित्र म्हणायचे नवरंग म्हणजे काय आहे? माझ्या मित्रांना सांगायचो जिथे सर्व साहित्य



मिळते ते नवरंग तेव्हा माझे मित्र सांगायचे अरे त्याला नवरंग म्हणत नाहीत तर जनरल स्टोअर्स म्हणतात.... तेव्हा खऱ्या अर्थाने मला जनरल स्टोअर्स चा अर्थ कळला. आज ही बहुतांशी शहरातील अनेक नागरिक जनरल स्टोअर्सला नवरंग म्हणताना दिसून येतात....अशी किमया साधणाऱ्या सन्मानीय साजिद सेठ यांना भावपूर्ण श्रदांजली

## माता रमाई जयंती निमित्त रविवारी देगाव येथे भीम गीतांचा जलसा व व्याख्यानाचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

माता रमाई जयंती निमित्त नायगाव तालुक्यातील देगाव येथे रविवारी भीम गीतांचा जलसा व व्याख्यानाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला असून महाराष्ट्रातील प्रसिद्ध गायिका भाग्यश्री इंगळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.



नायगाव तालुक्यातील महाराज सयाजीराव गायकवाड नगरी देगाव तालुका नायगाव येथे रविवार दिनांक २३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेपाच वाजता भव्य भीम गीतांचा जलसा व व्याख्यान ठेवण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन फुले – शाहू – आंबेडकर युवा मंचचे अध्यक्ष अविनाश गायकवाड यांनी केले आहे. कार्यक्रमास उद्घाटक म्हणून नांदेडचे खा.रवींद्र चव्हाण, खासदार नांदेड लोकसभा आ.राजेश पवार आमदार नायगाव विधानसभा राजेश देशमुख कुंटुरकर चेअरमन कुंटुरकर शुगर अँड अग्रो.तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी फुले – शाहू –आंबेडकर चळवळीचे भाष्यकार सुरेश गायकवाड राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून नायगावचे तहसीलदार डॉ. धम्मप्रिया गायकवाड,एल.आर.वाजे गटविकास अधिकारी प.स.नायगाव यांच्या सह अनेक दिग्गज मंडळी ची उपस्थिती या कार्यक्रमाला लाभणार आहे आयोजित व्याख्यानास प्रमुख वक्ते म्हणून प्रसिद्ध विचारवंत प्रा. यादव गायकवाड, मराठी वाङ्मय पुरस्कार प्राप्त लेखिका डॉ. करुणा जमदाडे, प्रा. बलभीम वाघमारे यांचे व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होऊन कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन स्वागताध्यक्ष युवा नेते राहुल गायकवाड, आणि फुले शाहू आंबेडकर विचार मंचचे प्रमुख तथा मुख्य आयोजक अविनाश गायकवाड यांनी केले आहे.

## मंत्र्यांचे आचार-विचार शुद्ध असावेत आरोप झाले की प्रथम राजीनामा द्यावा

### अण्णा हजारे यांचा मंत्री धनंजय मुंडे यांना अप्रत्यक्ष सल्ला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहिल्यानगर (वृत्तसंस्था)**

मंत्र्यांचे आचार–विचार शुद्ध हवेत. त्यामुळे त्यांच्यावर आरोप झाला की पहिल्यांदा जबाबदारी म्हणून त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला पाहिजे, असे मत ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी व्यक्त केले आहे. सद्यस्थितीत सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात सत्ताधारी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. अण्णा हजारे यांच्या या विधानाचा त्यांच्याशी संबंध जोडला जात आहे.कृषि खात्यातील कथित घोटाळा व बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडामुळे राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे अडचणीत सापडलेत. देशमुख हत्या प्रकरणात त्यांचा राईट हँड मानल्या जाणाऱ्या वाल्मीक कराडला अटक करण्यात आली आहे. त्याच्यावर मकोका अंतर्गत कारवाईही करण्यात आली आहे. यामुळे सत्ताधारी भाजपचे आमदार सुरेश धस यांच्यासह विरोधी पक्षांनी मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

**“ नांदेड दक्षिण चे आमदार श्री आनंदराव पाटील बोंढारकर साहेब यांनी वजीराबाद चौक पोलिस अधिक्षक कार्यालय येथिल श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवजन्मोत्सव सोहळ्याला भेट देऊन श्री छत्रपती शिवाजी महाराज याना अभिवादन केले.यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला.(लोकनेता न्युज नेटवर्क नांदेड)**



## खपराळ येथील गायरान जमिनी वर रात्रंदिवस मुरुमाचे उत्खनन




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

बिलोली तालूक्यातील खपराळा येथील शिवारातुन परवानगीच्या नावाखाली हजारो ब्रास मुरुमाचे उत्खनन होत आहे सविस्तर माहिती अशी की तालुक्यातील खपराळा येथे सर्वे नंबर २१९ या जमीनीवर दोनशे ब्रास मुरुम उत्खनन करण्याची परवानी नांदेड येथील गार्गी डेव्हलपरस यांना १७फेब्रुवारी ते २५फेब्रूवारी पर्यंत मुरुम उत्खनन करण्याची परवानगी देण्यात आली परंतु संबंधित परवानगीधारकाने सर्वे नंबर मधून मुरुम उत्खनन न करता बाजूला काही अंतरावर असलेल्या गायरान जमीनीतुन जेसीबिच्यासाहाने हजारो ब्रास मुरुमाचे रात्री बे रात्री उत्खनन करण्यात येत आहे याकडे महसूल विभागाचे तलाठी मंडळ अधिकारी यांनी उत्खनन करणा–याकडे अर्थपुर्ण दूर्लश करत आहेत तालूक्यात मुरूम रेती विटा तयार करण्यासाठी लागणारी माती याची अवैध मार्गाने वाहतुक होत आहे याकडे तहसिल प्रशासनाने पूर्णपणे लक्ष देण्याची गरज आहे

## निधन वार्ता



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिराढोण । प्रतिनिधी**

कालवश धोंड्याबाई नागोराव राक्षसे यांच दि २१/०२/२०२५ रोजी पहाटे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले त्यांचा अंत्यविधी दिनांक २२/०२/२०२५ रोजी सकाळी १० वाजता बौद्ध स्मशानभूमी शिराढोण येथे होणार आहे. त्या कालवश नागोराव राक्षसे पहिलवान यांच्या पत्नी होत.त्यांच्या पश्चात चार मुले (सुरेश राक्षसे,राहुल राक्षसे,शंकर राक्षसे व प्रा.कमलाकर राक्षसे) एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

# शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षणासाठी गटशिक्षणाधिकारी संजय येरमे यांनी केले कंधार येथे नियोजन!

## सुमारे ३५० शिक्षकांनी घेतले पहिल्या टप्प्यात प्रशिक्षण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्यावतीने जिल्हा परिषदेसह सर्वच शासकीय आणि खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नांदेड यांच्या माध्यमातून गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती कंधार यांच्या पर्यवेक्षणात सदरील शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षणाचा दुसरा टप्पा दि १७ फेब्रुवारी पासून सुरू झाला असून यापुर्वी पहिल्या टप्प्यात कंधार तालुक्यातील सुमारे ३५० शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले अशी माहिती गटशिक्षणाधिकारी संजय यरमे यांनी दिली,

कंधार तालुक्यातील स्वामी रामानंद तीर्थ शिक्षणशास्त्र महाविद्यालय,बाळंतवाडी येथे कंधार तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांसह,खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षक क्षमता वृद्धीसह,सक्षमीकरणासाठी गटशिक्षणाधिकारी संजय यरमे यांच्या मार्गदर्शनाखाली चार टप्पात प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.त्यापैकी पहिल्या टप्प्यात तालुक्यातील ३५० शिक्षकांचे क्षमता वृद्धी प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करण्यात आले. तर दुसरा टप्पा दि १७ फेब्रुवारी पासून २२ फेब्रुवारी या कालावधीत होणार आहे. उपस्थित शिक्षक प्रशिक्षणार्थींना राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ची वैशिष्टये,राज्य अभ्यासक्रम आराखडा (५+३+३+४) संरचना शालेय शिक्षण व क्षमता आधारित मुल्यांकन–संकल्पना,क्षमताधिष्ठीत अध्ययन निष्पत्तीवर आधारीत प्रश्न निर्मिती कौशल्य, विद्यार्थ्यांचे समग्र प्रगतिपत्रकातील नोंदी,यांसह शालेय गुणवत्ता मुल्यांकन व आश्वासन आराखडा कसा पूर्ण करावा याविषयी व्यवस्थीत मार्गदर्शन करण्यात येत आहे.


सदरील विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नांदेड यांच्या वतीने माध्यमिक स्तरावर तज्ञ सुलभक म्हणून रविराज केसराळीकर, शिवसांब गणाचार्य,बाबाराव विश्वकर्मा, माधव केंद्रे, विक्रम शिंदे, साहेबराव शिंदे,शिवकुमार कनोजवार, फिरदोस शेख यांनी यशस्वीपणे मार्गदर्शन केले. तर प्राथमिक स्तरावर एकनाथ केंद्रे, दत्तात्रय कदम,चांदोबा कळकवणे, नवनाथ बोळकेकर,मन्मथ पांडागळे,अमृत पौळ, रोहिणी माने यांनी तज्ञ सुलभक म्हणून मार्गदर्शन केले. सर्व प्रशिक्षणार्थींना सकाळी व दुपारी दोन वेळा चहा, शुद्ध पाणी व दुपारच्या भोजनाची उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आलेली होती.संजय यरमे गटशिक्षणाधिकारी पं.सं.कंधार हे स्वतः पूर्ण वेळ उपस्थित राहून प्रशिक्षणार्थ्यांची गैरसोय होणार नाही,याची काळजी घेत होते.


## प्रजाहितदक्ष, महापराक्रमी शिवाजी राजांनी महिलांचा सन्मान केला

# वर्तमान राजकारण्यांनी शिवरायांच्या विचारांचा वारसा जोपासावा-गणपतराव माखणे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**





उमरी.लोक कल्याणकारी प्रजाहितदक्ष जाणता राजा शिवरायांनी प्रतिकूल स्थितीत दुश्मनांशी लढा देतानाच महिलांच्या सन्मानाकडेही तेवढ्याच ताकदीने लक्ष दिले. हेच त्यांचे गुण आजच्या वर्तमान काळात राजकारण्यांनी अंमलात आणण्याची गरज आहे. असे प्रतिपादन शिवव्याख्याते गणपतराव माखणे यांनी केले असून बलाढ्य आदिलशाहीच्या विरोधात लढा देताना शिवरायांनी अनेक साहसी निर्णय घेतले. साहसाचा संकल्प पूर्ण करताना त्यांनी अनेक संकटांचा सामना केला. आपले संकल्प पूर्ण करण्यासाठी त्यांनी आपल्या सहकाऱ्यांवर विश्वास ठेवला. प्रत्येक क्षणी प्रजेच्या हिताचाच विचार केला. शिवरायांच्या प्रेरणेचा वारसा पुढे नेताना राजकीय पक्षभेद बाजूला ठेवून व सर्वांच्या सहकार्याने विकासाची कामे करणार आहोत. उमरी शहरातील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याची देखभालीसाठी स्थानिक पातळीवर पुतळा समीती स्थापन करण्यात येईल. सर्वांच्या आस्थेचा व अस्मितेचा विषय असल्याने उमरी व तालुक्यातील सर्व नागरिकांचे यासाठी सहकार्य अपेक्षित असल्याचे आमदार राजेश पवार यांनी सांगितले. प्रारंभी जयंती मंडळाचे संयोजक पत्रकार बी. व्ही. चव्हाण यांनी आपल्या प्रास्ताविकपर भाषणात , उमरी शहरात शिवरायांची जयंती साजरी करत असताना इतर अवांतर बाबींना फाटा देत शिवरायांचा इतिहास , शिवरायांचे प्रेरणात्मक विचार लोकांमध्ये रुजविण्याच्या दृष्टीने समाज प्रबोधन पर कार्यक्रम घेतले जातात. यावर्षीही मोठा सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यासाठी आमदारांनी पुढाकार घ्यावा. अशी विनंती केली. नागरिकांचा त्यासाठी चांगला प्रतिसाद मिळतो . अशी माहिती चव्हाण यांनी यावेळी दिली. मोंढा मैदानावर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा स्थापन झाल्यानंतर ही पहिलीच शिवजयंती थाटामाटात साजरी करण्यात आली. तत्पूर्वी आमदार राजेश पवार व त्यांच्या पत्नी पूनमताई पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण व अश्वारूढ पुतळ्याचे विधिवत पूजन करण्यात आले. उपस्थित सर्व मान्यवर व शिवप्रेमींनी छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचे पूजन करून पुष्पांजली वाहिली. बाजार समितीचे सभापती शिरीषराव गोरठेकर जिल्हा बँकेचे संचालक कैलासराव गोरठेकर, ड. भाऊसाहेब गोरठेकर ,डॉ. विक्रम देशमुख ,सुभाषराव देशमुख, अजिंक्य पवार, पारस दर्डा, तहसीलदार प्रशांत थोरात, पोलीस निरीक्षक अंकुश माने, मुख्याधिकारी निलम कांबळे,गणेशराव कौडगावकर, बापूसाहेब येताळे, माजी नगराध्यक्ष विजय उत्तरवार, श्रीनिवास अनंतवार, संजय कुलकर्णी, सुभाष पेरेवार, अशोक मामीडवार, अनील दर्डा, आनंदराव यलमगोंडे, रावसाहेब पाटील कुदळेकर, सौ.शारदा यमेवार, श्रीमती विद्या अग्रवाल, डॉ .खानसोळे, बालाजी येरावार, गोविंद अट्टल, प्रभाकर पुयड, गणेशराव देशमुख , राजेश जाधव, गोविंदराव ढगे , ज्ञानेश्वर सावंत, गंगाधर पाटील पुयड, ज्ञानेश्वर कदम ,अविनाश कदम, वारकरी साहित्य परिषदेचे तालुकाध्यक्ष मारोतराव मोरे, गणेशराव पगलवाड, रामचंद्र देस्टेवाड, संभाजी सावंत, भारत सावंत , दासा पाटील, भारत सावळे, किशोर पबीतवार , संतोष शिरूरकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. जयंती मंडळाच्या वतीने विजय चव्हाण गजानन अलसटवार शुभम गोरे बालाजी पवार, सय्यद रऊफ,महेश पडोळे,शुभम जाधव, गोविंद पवार, पवन पगलवाड, राम पाटील तोडे आदींनी मान्यवरांचे स्वागत केले. राजेश मनूरकर यांनी सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन केले.

# आष्टी तालुक्यात शिवजयंतीचा जल्लोष,अष्टदिशा दणाणल्या शिवघोषाने भगवेमय वातावरण

## रयतेचे राजा युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्या साठी जळगांव कारखाना येथे हजारो शिवभक्तांची गावागावातून रॅली!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**




आष्टी तालुक्यात शिवजयंतीचा जल्लोष मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.संपूर्ण तालुका शिवघोषाने दणाणला,वातावरण भगवेमय झाले होते.जळगांव कारखाना येथे हजारो शिवभक्त गावागावातून रॅली काढून रयतेचे राजा युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यासाठी एकत्र आले होते.शिवभक्तांच्या उत्साहाने परिसर भरून गेला होता, आणि शिवाजी महाराजांच्या कार्याचे स्मरण करून उत्सवाची शोभा वाढवली.

रयतेचा राजा,युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आष्टी तालुक्यात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.आ.सुरेश धस,माजी आ.भिमराव धोंडे,माजी आ. बाळासाहेब आजबे,मा.आ.साहेबराव दरेकर,सतिश 'आबा' शिंदे यांच्यासह तहसिलदार वैशाली पाटील,गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव,नायब तहसिलदार बाळदत्त मोरे यांनी आष्टी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात महाराजांना अभिवादन करून शिवभक्तांना शुभेच्छा दिल्या.शिवजयंतीनिमित्त आष्टी शहरात शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी तीन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमांतर्गत वकृत्व स्पर्धा, पोवाडा, भजन,सांघिक नृत्य यासारख्या स्पर्धांचा समावेश होता. विजयी स्पर्धकांना पारितोषिके, प्रशस्तीपत्रे,आणि सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात आले. शहरातील तसेच तालुक्यातील अनेक शाळांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला, ज्यामुळे शिवजयंतीला विद्यार्थ्यांच्या सहभागाने अधिक रंगत आली.

## बोरवाडी तलावाचे पाणी उपलब्ध प्रमाणपत्र मिळाले

# पण प्रशासासकीय मान्यता आडकली लालफितीत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**



मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या बोरवाडी पिंपळदरा येथील तलावाचा प्रश्न आखेर मार्गी लागला असुन या साठी प्रशासकीय मान्यता कधी मिळणार व कामाला सुरवात कधी होणार याची आस आत्ता बोरवाडी येथील कोरडवाहु शेतकर्यांना लागली आहे.

बोरवाडी येथील पिंपळदरा तलावाचे पाणी उपलब्ध प्रमाणपत्र मागील एक वर्षापासून नाशिक विभागाकडे निधि अभावी थांबवण्यात आले होते. परंतु माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या प्रयत्नातून तो निधी जल विज्ञान केंद्रास वर्ग झाला आणि २०२५ च्या सुरवातीलाच पाणी प्रमाणपत्र उपलब्ध झाले. पाणी प्रमाणपत्र उपलब्ध होवुन देखील काही तांत्रिक अडचणींमुळे या तलावाच्या कामास विलंब होत आहे. सर्वेक्षण जरी झाले असले तरी प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव अजुन पर्यंत तयार झाला नसल्याने या उन्हाळ्यात मार्च नंतर देखील प्रत्यक्षात कामाला सुरुवात होणार की नाही असा प्रश्न बोरवाडी परिसरातील शेतीच्या पाण्याची आस लावून बसलेल्या शेतकर्यांना पडलेला आहे. पिंपळद्र्यातील तलाव लवकर पुर्ण झाल्यास बोरवाडी येथील कोरडवाहू व हंगामी आसलेली शेती ही बारमाही पाण्याखाली येणार असुन या मुळे येथील दिवाळी नंतर होणारे स्थलांतर थांबणार असुन शेतकऱ्यांच्या देखील उत्पन्नात वाढ होऊन त्यांचे जीवनमान उंचावणार असल्याने या मतदार संघाच्या आमदार श्रीजया चव्हाण यांनी येथील तलावाचे शासकीय प्रलंबित प्रश्न तत्काळ मार्गी लावून काम पूर्ण करावे असा सुर बोरवाडी व परिसरातील शेतकरी वर्गातून निघत आहे.

# महाराष्ट्रातील युवकांनी साजरा केला इंग्लंड मध्ये शिवजन्मोत्सव!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



हिंदवी स्वराज्य संस्थापक आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती चा समारोह महाराष्ट्रातील व त्यातही मराठवाड्यातील तरुणांनी इंग्लंड युके मधील लिव्हरपूल येथे मोठ्या उत्साहाने साजरी केली. शिवरायांचा भगवा झेंडा मानाने परदेशात अटकेपार फडकवला यांच कौतुक सोशलमिडीयावर होत आहे.

संबंध हिंदुस्थान सह परदेशातही आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती सामाजिक उपक्रम, मिरवणुका, ढोल-ताशाच्या गजरात मोठ्या आनंदाने व उत्साहात साजरी करण्यात येते.हिच जयंती इंग्लंड युके मधील लिव्हरपूल येथे साजरी महाराष्ट्र मंडळाने साजरी केली. या मंडळाचे सदस्य अनिकेत मोरे (मुंबई),मंगेश खरात(सोलापूर),अक्षय कुंटेवार (कंधार-नांदेड),अमोल शिरके (कोल्हापुर),संतोष देसाई (मुंबई), विनित सुवर्णा (मुंबई ), अनिकेत शेलार (मुंबई ), शुभम माने (ठाणे), सागर धात्रंगे(कल्याण ), निखील कसबे, मानसी महाडीक, स्वाती पटेल, स्मिता खरात, काजल हिर्लेकर ह्या महाराष्ट्राच्या वेग-वेगळ्या कोपर्यातुन ईथे लिव्हरपूल लंडन येथे कामानिमीत्त स्थाईक झालेली ह्या शिवप्रेमींनी एकत्र येऊन हा जल्लोष साजरा केला. महाराष्ट्रीयन व भारतीय काही युवक तिथे शिक्षण,उद्योग,नौकरी यासह काही कामानिमित्ताने तिथे महाराष्ट्र मंडळ म्हणून कार्यरत आहेत. ते भारतीय सण व राष्ट्रीय सण साजरे करतात. त्याअनुषंगाने ह्या वर्षी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे आयोजन युके त केले.शिवजयंती कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून कृष्ण मंदिरांचे नवनिर्वाचित प्रसिंडेंट सुशांत हिर्लेकर व काजल हिर्लेकर ह्या दांपत्यासह माजी व्हीच पी युके प्रमुख गिरीधारीलाल भान यांच्या शूभ हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचा सत्कार मौलिक पटेल व हसीत शाह यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी गिरीधारीलाल भान यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जिवावर केलेल्या भाषणाने सर्वांना मंत्रमुग्ध केले. सकाळी ८ :३० वाजता महाराष्ट्र मंडळ लिव्हरपूल च्या मंडळाने सादर केलेले नृत्य,चिमुकल्यांची भाषणे, मार्शल आर्ट, एकल व सामुहिक गितांनी कार्यक्रमांची सुरुवात झाली. कार्यक्रमाचा समारोप गणपती आणि शिवाजी महाराजांच्या आरतीने झाला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर दात्रंगे व सुप्रिया चिटगोपकर यांनी केले. स्वरूची भोजनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. एकुणच महाराष्ट्र मंडळ लिव्हरपूलातील सदस्याच्या अपार मेहनतीमुळे तिसरा शिवजन्मोत्सव मोठ्या जल्लोषात, आनंदात, खेळीमेळीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. निघालेल्या मिरवणूकीत ढोलताशे,भगवा ध्वज,फेटे ठरविले. पुरूष व महिलांनी भगवा वस्त्र व फेटे रूमाल घालून. शहरातून भव्य दिव्य डोळ्याचे पारणे फेडणारी मिरवणुक काढली यामध्ये सर्व भारतायींनी नोंदवला.हा शिवजन्मोत्सव मिरवणूक इंग्लड वाशियांनी ह्या आगळावेगळ्या क्षणाचा मनमुराद आनंद घेतला.

# एक भेट ठरली ग्रेट भेट!



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नाशिक । वृत्तसेवा**

कवी लेखक संपादक साहेबराव नंदन तात्या नाशिक यांच्या निवासस्थानी वेस्टीज प्रॉडक्ट्स आरोग्यवर्धक कंपनीच्या सेल्स विभागाच्या सौ. प्रतिभा बुवा* ह्या त्यांच्या सहकारी सौ. सुचिता नंदन यांच्या समवेत, प्रॉडक्ट्सची माहिती देण्यासाठी आल्या असता, त्यांनी स्वेच्छेने आपल्या सगर साहित्याचे प्रकाशने, कवी लेखक संपादक साहेबराव नंदन तात्या लिखित, संपादीत, सगर रत्न विशेषांक / सगर सेवार्थी अंक / सगर दिपोत्सव दिवाळी अंक / २२ / २३ /२४ / गावगाडा काव्य संग्रह / चरित्रात्मक परिसस्पर्श कादंबरी इ . साहित्य वाचावयास मागून घेतले.

आपले आरोग्य आपल्या हाती, वेस्टीज तुमच्या साथी, भेटी प्रसंगी आपल्या साहित्याच्या प्रज्वलीत झाल्या वाती ! तीन तासाच्या सहवासात सुधृढ आरोग्यासाठीच्या काही टिप्स समजावून सांगितल्या. काहींचे डेमो सादर केले. चहापान नाश्ता येथेच्छ गावगाड्याच्या काट्याकुट्या धसकटाच्या बांधावरच्या गप्पा ते सासू सुन वितंड ! मायबोली अहिराणी मधून साहेबराव नंदन तात्या यांनी स्वःरचित कवितांचे भावविश्व उलगडून दाखवले. नंदन उभयंताच्या कर्तव्य तत्पर सेवा स्वागताचे त्यांनी भरभरून कौतूक केले. हास्य विनोदाच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक कौटूंबिक विषयांवर आपले मत व्यक्त केले. आजच्या भेटीत प्रतिभाजी भारावून गेल्या होत्या. आपल्या सगर साहित्याच्या पुढील स्नेहबंध अंकाच्या प्रकाशनासाठी येण्याची इच्छा व्यक्त केली. या प्रसंगी सौ. सरलाताई नंदन यांनी हळदी कुंकूचे वाणं लावले. या आजची भेट ग्रेट भेट ठरली. असे साहेबराव नंदन तात्या यांनी सांगितले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904